
११

# गुरुपुत्र फतेहसिंह जोरावरसिंह



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा.क्र. १५३५

BVBK-0401535
BVBK-0401535

वाचनालय
बा.वा.
९५३४
९५१५८३

पुष्प ११

# गुरुपुत्र
# फतेहसिंह, जोरावरसिंह

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
दा. क्र. ९४३४ लेखक ९५१५८३
विषय हरभजनसिंह हंसपाल

अनुवादक
कमलाकर धारप

BVBK-0401535
BVBK-0401535

भारत-भारती (मराठी संस्करण)
रुईकर पथ, महाल, नागपूर-२

प्रकाशक

भारत-भारती (मराठी संस्करण) बाल पुस्तकमाला

प्रभाकर फैजपूरकर
मंत्री
श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिति
रुईकर पथ, नागपूर, महाराष्ट्र

संपादक—मराठी संस्करण
सुरेश दत्तात्रेय देशपांडे

प्रथम संस्करण फेब्रुवारी १९८१

किंमत रु. २—००

मुद्रक
चंद्रकांत तापस
श्री प्रसाद मुद्रण, ८, वर्धा मार्ग, नागपूर—१२

## थोडे उपक्रमाविषयी

आपल्या पूर्वजांचे स्मरण म्हणजे कर्तृत्वाच्या प्रेरणेचा अखंड स्त्रोत. त्यांच्या जीवनाच्या अभ्यासातून आपल्याला नेहमीच बोध आणि मार्गदर्शन मिळत आलेले आहे. केवळ भारतीयांनाच नव्हे, तर जगातील साऱ्या मानवांना, आपले हे सांस्कृतिक धन म्हणजे एक कुतूहलाचा विषय आहे.

आपला गौरवशाली इतिहास ज्यांनी निर्माण केला, त्या महान व्यक्तींची जीवनचरित्रे सरळ, सोप्या आणि सहज पद्धतीने सादर करण्याचे कार्य बंगलोरच्या 'राष्ट्रोत्थान परिषदे'ने सुरू केले. कन्नड आणि इंग्रजी भाषांमधून लिहिलेल्या छोटचा-छोटचा पुस्तकांच्या रूपाने हा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोचविण्याचे हे कार्य आहे. मुळात ही चरित्रे कन्नड भाषेमध्ये लिहिलेली आहेत.

नागपूरच्या 'श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती'ने या चरित्रांचे मराठी अनुवाद प्रकाशित

करण्याची जबाबदारी स्वीकारलेली असून 'भारत-भारती' (मराठी संस्करण) या उपक्रमाच्या अंतर्गत हे प्रकाशनकार्य चालू आहे.

आपले ऐतिहासिक महापुरुष, ऋषी-मुनी, सम्राट, वीर, योद्धे, साधुसंत, राजनीतिज्ञ, कलावंत इत्यादी साऱ्यांचा समावेश या पुस्तकमालेत आहे.

आपला हा अक्षय ठेवा उमलत्या पिढीच्या स्वाधीन करीत असता त्या कार्यात आपल्यालाही काही वाटा उचलता आला, याबद्दल आम्हाला आनंद वाटतो. आपल्यालाही हा उपक्रम आवडेल आणि आपले सहकार्य या उपक्रमास लाभेल, असा विश्वास आहे.

विनीत

**सुरेश दत्तात्रेय देशपांडे**

सम्पादक

# गुरुपुत्र

## फतेहसिंह, जोरावरसिंह

फतेहसिंह आणि जोरावरसिंह ही दोन बालके म्हणजे शिखांचे गुरु श्रीगोविंदसिंह यांचे पुत्र. एक पांच वर्षाचा व दुसरा सात वर्षाचा. परंतु आपल्या धर्माचे रक्षण करण्यासाठी उभयतांमध्ये चढाओढ सुरू झाली. हसत हसत दोघेही भिंतीत चिणले गेले. स्वधर्मासाठी इतक्या लहान वयात, महान पराक्रमी वीराप्रमाणे आत्मसमर्पण करणाऱ्या बालवीर गुरु-पुत्रांची ही ओजस्वी कथा आपल्या इतिहासातील एक सुवर्णपृष्ठ आहे.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. ९४३५ दिनांक ९५।८।८३
विषय गुरुपुत्र क्र. ........

# फतेहसिंह, जोरावरसिंह

भारताच्या इतिहासात गुरु तेगबहादूर यांनी केलेले बलिदान ही एक अत्यंत महत्वाची घटना होती. ते शीखांचे नववे गुरु होते. त्या काळी भारतात सर्वत्र मोगलांचेच साम्राज्य होते. या साम्राज्याचे सम्राट औरंगजेब, हे एक कडवे मुसलमान होते. हिंदू लोकांनी इस्लाम धर्माचा स्वीकार करावा म्हणून त्यांनी हिंदूंचा नानाप्रकारे छळ केला. त्यांना तऱ्हेतऱ्हेचे कष्ट दिले. कारण सगळ्या भारतवर्षाला इस्लामचा अनुयायी बनविण्याचे स्वप्न तो मोगल सम्राट पाहात होता.

त्या काळात धार्मिक क्षेत्रात साऱ्या हिंदूंचे नेतृत्व ब्राह्मणवर्ग करीत होता. ही गोष्ट लक्षात घेऊन औरंगजेबाने ब्राह्मणांचा छळ सुरू केला. हा छळ करण्यामागे औरंगजेबाचा वेगळाच विचार होता. ब्राह्मणांनी जर मोठ्या संख्येत इस्लाम धर्म स्वीकारला

तर इतर लोकही इस्लामकडे सहज वळतील असे त्याला वाटत होते.

औरंगजेब बादशाहाला खुश राखण्यासाठी त्यांच्या सरदारांनीही हिंदूंना जबरदस्तीने मुसलमान बनविण्याचे सत्र सुरु केले. हिंदूंना केवळ मुसलमान बनवूनच त्यांचे समाधान होत नव्हते म्हणून त्यांनी अनेक ठिकाणी हिंदूंची मंदिरे उध्वस्त करून तेथे मशिदी उभारल्या. हिंदूंवर झिजीया कर लादण्यात आला. हिंदूंना शस्त्र धारण करण्यास मनाई करण्यात आली. एवढेच नव्हे तर हिंदूंना घोड्यावर बसण्याचीही परवानगी नाकारण्यात आली.

भारतीय संस्कृती आणि धर्म यांचा समूळ नाश करण्याचा विडाच जणू मोगल सम्राटांनी उचलला होता !

## छोट्या गोविंदाचे साहस

काश्मीरच्या नबाबांनीही तेथील ब्राह्मणांना जबरदस्तीने मुसलमान करण्याचे ठरविले तेव्हा सारे ब्राह्मण भयभीत झाले. ते सारे काश्मीरी ब्राह्मण एकत्र आले व विचारविनीमय करून त्यांनी स्वतःचा

धर्मान्तरापासून बचाव करण्यासाठी आनंदपूर येथे असलेल्या गुरु तेगबहादूर यांना शरण जायचे ठरविले.

विचार झाला. त्याप्रमाणे कृतीस आरंभ झाला. काश्मीरातील पाचशे ब्राह्मणांचे एक पथक पंडित कृपाराम यांच्या नेतृत्वाखाली आनंदपूरला जाण्यास निघाले.

मजल दरमजल करीत ते ब्राह्मण आनंदपूर येथे पोचले व त्यांनी आपली व्यथा गुरूंसमोर मांडली. त्यांची व्यथा ऐकून गुरु तेगबहादूर यांनाही काळजी वाटू लागली. तेथे जमलेली समस्त मंडळी या संकटाचा मुकाबला कशा तऱ्हेने करावा याचा विचार करू लागली. वातावरण क्षणभर तंग झाले.

तेवढ्यात गुरु तेगबहादूर यांचा मुलगा गोविंद आपले नित्याचे खेळ आटोपून घरी परतला.

घरातील गंभीर वातावरण बघून तोही क्षणभर गंभीर झाला आणि आपल्या वडिलांजवळ जात म्हणाला, "पिताजी, आपण सारे कोणत्या चिंतेत मग्न आहात?"

गुरु तेगबहादूरांनी आपल्या चिंतेचे कारण आपल्या

मुलाला थोडक्यात सांगितले. शेवटी ते म्हणाले, "या ब्राह्मणांना ज्या छळास तोंड द्यावे लागत आहे त्यातून त्यांची जर सुटका व्हायची असेल तर त्यासाठी एखाद्या थोर पुरुषाला आत्मसमर्पण करावे लागेल."

आपल्या पित्याचे ते शब्द ऐकताच बालक गोविंद तात्काळ म्हणाला, "पिताजी, तुमच्यापेक्षा दुसरा थोर पुरुष मला तरी दिसत नाही."

गोविंदाचे ते धाडसी उच्चार ऐकून गुरु प्रसन्न झाले. त्यांच्यासमोर उभ्या ठाकलेल्या प्रश्नाचे उत्तर त्या लहान बालकाने चुटकीसरशी दिले होते. त्या बालकाचे त्यावेळी वय तरी किती होते ? अवघे नऊ वर्षांचे !

मग गुरु तेगवहादूर त्यांच्याकडे आलेल्या काश्मीरी ब्राह्मणांकडे वळून म्हणाले, " तुम्ही आत्ताच्या आत्ता औरंगजेबाला निरोप पाठवा की आमचे गुरु तेग-बहादूर हे जर इस्लामचा स्वीकार करणार असतील तरच आम्ही सारे मुसलमान बनण्यास तयार आहोत."

गुरु तेगबहादूरांचा निरोप त्या काश्मीरी ब्राह्मणांनी औरंगजेबापर्यंत पोचता केला तेव्हा औरंगजेबाच्या

अंगाची लाहीलाही झाली. त्याने ताबडतोब फर्मान काढून गुरु तेगबहादूर यांना आपल्या दरबारात हजर राहण्याची आज्ञा केली.

शाही फर्मानानुसार गुरु दिल्लीच्या वाटेवर असतांना त्यांना वाटेतच आग्रा येथे कैद करण्यात आले.

गुरु तेगबहादूरांनी एकतर इस्लाम धर्म स्वीकारावा नाहीतर काहीतरी चमत्कार करून दाखवावा म्हणून त्यांचा अनन्वित छळ करण्यात आला. पण गुरु आपल्या निर्धारापासून रतीभरही ढळले नाहीत. त्यांनी त्या दोन्ही अटी नामंजूर केल्या तेव्हा त्यांची दिल्लीच्या चांदणी चौकात हत्या करण्यात आली.

आपण केलेले बलिदान व्यर्थ ठरणार नाही याची तेगबहादूरांना खात्री होती. गुरु तेगबहादूर यांनी आत्मबलिदान करून स्वदेश आणि स्वधर्म यांचे संरक्षण केले. त्यांच्या तेजस्वी बलिदानामुळेच ते " भारताचे कवच " म्हणून ओळखले जात होते.

## गुरु गोविंदसिंह

गुरु तेगबहादूर यांच्या बलिदानानंतर त्यांचे पुत्र

गोविंदसिंह हेच शीखांचे गुरु झाले. गोविंदसिंहांनी वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी आपल्या वडिलांना आत्मसमर्पण करण्याची प्रेरणा दिली. याच धाडशी पुत्राने पुढील काळात मोगल सम्राट आणि पहाडी राजे यांच्याशी अनेक वेळा झुंज घेतली आणि बहुतेक झुंजीत विजय मिळविला. गुरु गोविंदसिंह हे महान योद्धे होते. तसेच ते कवी पण होते. त्यांनी जितक्या सहजतेने कृपाण चालविले, तितक्याच सहजतेने त्यांनी आपल्या लेखणीचे कौशल्यही दाखवून दिले. गुरु गोविंदसिंहाना चार मुलगे होते. अजितसिंह, जुझारसिंह, जोरावरसिंह,आणि फतेहसिंह अशी त्यांची नावे होती.

## औरंगजेबाने घात केला

एकदा गुरु गोविंदसिंहाचे वास्तव्य आनंदपूर येथे होते. ती संधी साधून मोगलांनी डोंगरी राजांची मदत घेऊन, किल्ल्याला चारी बाजूनी वेढा दिला. मोगल सैन्याने केलेले हल्ले गुरु गोविंदसिंहांनी परतवून लावले. आनंदपूरचा किल्ला ताब्यात घेण्याचे मोगल सैन्याचे प्रयत्न जेव्हा विफल ठरले, तेव्हा औरंगजेबाने गुरूंना संदेश पाठविला. या संदेशात औरंगजेबाने

पवित्र कुराणाची शपथ घेऊन युद्धबंदीचा प्रस्ताव मांडला होता. त्याची अट फक्त एवढीच होती की गुरु गोविंदसिंहाने आनंदपूरचा किल्ला सोडून निघून जावे. औरंगजेबाच्या म्हणण्यावर गोविंदसिंहाचा विश्वास नव्हता, तरीही त्यांच्या शीख सरदारांच्या सल्ल्यानुसार त्यांनी, किल्ला सोडून निघून जाण्याची तयारी दर्शविली.

खरं तर काहीतरी निमित्त काढून गुरु गोविंदांना किल्ल्याबाहेर काढण्याचा मोगलांचा तो डाव होता. तो डाव यशस्वी झाला. आपल्या बरोबर मूठभर सैनिक घेऊन गोविंदसिंह किल्ल्याबाहेर पडले. मोगल सैन्य ह्या संधीची वाटच पहात होते. गुरुजी किल्ल्याबाहेर पडताच मोगलांनी त्यांच्यावर हल्ला केला. सरसा नदीच्या तीरावर त्यांचे तुंबळ युद्ध जुंपले. शीख सैनिक संख्येने कमी असले तरी त्यांनी मोगल सेनेशी प्रखर झुंज दिली. शीखांच्या तळपत्या तलवारीने हजारो मोगलांना यमसदनाची वाट दाखविली. प्रसंग ओळखून गुरुजींनी चमकौर च्या दिशेने मोगल सैन्यास पाठीवर घेऊन मार्गक्रमणास सुरुवात केली. ह्यावेळी अजितसिंह व जुझारसिंह

ही दोन्ही मुलं त्यांच्या बरोबर होती.

**पुत्रांना वीरमरण**

सरसा नदी पार करून गुरुगोविंदसिंह माजरपूर ह्या गावी पोहोचले. मोगलांचे सैन्य त्यांच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे, हे वृत्त समजताच त्यांनी सरळ चमकौर गाठले. तेथे त्यांनी एका बगिच्यात आश्रय घेतला. या बगिच्यात एका जाट शेतकऱ्याची उंच हवेली होती. त्या हवेलीलाच त्यांनी आपला किल्ला बनविले. सुरुवातीला त्यांनी आपले सहा सैनिक मोगल सेनेशी मुकाबला करण्यासाठी पाठविले. त्या सैनिकांनी अनेक मोगलांना यमसदनास पाठविले आणि मगच ते धारातीर्थी पडले. अखेर शत्रूशी लढत देण्यासाठी एकही सैनिक उरला नाही, तेव्हा गुरु गोविंदसिंह स्वतः रणमैदानावर आले. आपले धनुष्य-बाण सज्ज करून त्यांनी मोगल सेनेवर बाणांचा नुसता वर्षाव सुरु केला. त्यात मोगलांचे सेनापति नाहरखान आणि गैरतखान हे मारले गेले. सेनापति पडलेले पहाताच मोगल सैन्याचा धीर खचला आणि त्यांनी त्या दिवसापुरती तरी रणातून माघार घेतली.

पण मोगल सैन्याने पराभव न पत्करता पहाडी नरेशांच्या मदतीने पुन्हा एकदा संघटितपणे युद्धाची तयारी केली.

दुसऱ्या दिवशी मोगल सैन्याने जेव्हा पुन्हा त्यांच्यावर हल्ला केला, तेव्हा गुरु गोविंदसिंहाचे थोरले चिरंजीव अजितसिंह हे पाच सैनिकांसह रण-मैदानावर उतरले. यावेळी त्यांचे वय अवघे १८ वर्षांचे होते. आपल्या वडिलांच्या आशीर्वादाने त्यांनी शत्रूशी प्रखर झुंज दिली. त्या लढाईत अनेक मोगल सैनिक मारले गेले आणि त्यांतच अखेर अजितसिंहाला वीर-मरण आले. आपल्या भावाची जागा घेण्यासाठी जुझारसिंह वडिलांची आज्ञा घेऊन पुढे झाला. तो आणि त्यांचे पाच सैनिक यांनी देखील अखेरचा श्वास असेपर्यंत शत्रूशी लढत दिली.

## सारे कुटुंब विस्कळित झाले

आनंदपूरच्या किल्याचा त्याग करण्यापूर्वी गोविंद-सिंहाच्या साऱ्या कुटुंबाची वाताहत झाली. गुरुजींचे दोन लहान मुलगे जोरावरसिंह आणि फतेहसिंह हे आपल्या आजीसह आनंदपूर सोडून निघून गेले. जंगले आणि डोंगर यातून मार्ग काढीत ते एका गावी पोहो-



जोरावरसिंह व फतेहसिंह आपली आजी गुजरीदेवी हिच्यासोबत जंगलातून आणि डोंगरातून मार्ग काढीत निघाले.

चले. तेथे कम्मो नावाच्या एका माणसाशी त्यांची गाठ पडली. कम्मो हा गावातील एक पाणक्या होता. घरची अत्यंत गरीबी असल्याने तो कसाबसा जीवन जगत होता. पण तशाही स्थितीत त्याने माणूसकी सोडली नव्हती. त्याने गुजरीदेवीस आणि तिच्या बरोबर असलेल्या दोन मुलांना ताबडतोब ओळखले आणि त्यांना आपल्या घरी चालण्याची विनंती केली. तिचा स्वीकार करून ते सारे कम्मोच्या घरी उतरले. कम्मोने अत्यंत प्रेमाने त्यांची सेवा केली.

**गंगू ब्राह्मण**

कम्मो रहात होता त्या मोहोल्ल्यात काही कामासाठी गंगू ब्राह्मण येऊन पोहोचला. या गंगू ब्राह्मणाने गुरु गोविंदसिंहाकडे बावीस वर्षे स्वैंपाक्याचे काम केले होते. गुरुजींची मुलं कम्मोकडे उतरली आहेत, असे समजताच त्याला फार आनंद झाला. कम्मोकडे जाऊन त्याने गुजरीदेवीची भेट घेतली व त्यांना आपल्या गावाला येण्याविषयी वारंवार आग्रह केला. गंगू ब्राम्हणाच्या निमंत्रणामुळे गुजरीदेवी विचारात पडल्या. त्यांच्या मनात अनेक तऱ्हेचे विचार येत होते. गंगू ब्राह्मणाने जर त्यांचा विश्वासघात

केला तर त्यांच्या दोन्ही मुलांची अवस्था काय होईल? त्यांचा जीव तर धोक्यात येणार नाही ना? असाही विचार त्यांच्या मनात आला. एका मागून एक संकटं कोसळल्यामुळे गुजरीदेवींचे हृदय हळवे झाले होते. त्या चेहऱ्यावर जरी प्रसन्नता दर्शवित असल्या तरी त्यांचं मन त्यांच्या मुलांविषयीच्या चिंतेने व्यग्र झालं होतं. गुजरीदेवी कसंही झालं तरी गुरु गोविंदसिंहांची आई होती. तिनं साऱ्या परिस्थितीचा अनेकदा विचार केला. त्यांची द्विधा अवस्था पाहून गंगू म्हणाला, "माताजी, मी आपला जुना सेवक आहे. अनेक वर्ष मी तुमच्याकडचं मीठ खाल्लं आहे, आज तुम्ही संकटात आहात. अशा वेळी तुमची सेवा करण्याची मला संधी द्या. मी तुमची आणि या लहान बालकांची माहिती या कानाची त्या कानालाही लागू देणार नाही."

गंगूच्या आश्वासनाने गुजरीदेवी निश्चित झाल्या. त्यांनी गंगू ब्राह्मणाच्या खेडी या गावाला जाण्याची तयारी केली. गंगूने त्यांचे सारे सामान एका खेचरावर लादले आणि त्यांच्यासह तो आपल्या गावास जाण्यास निघाला. गुजरीदेवीचे बोट धरून ती दोन्ही मुलं

रस्त्याने पायी-पायी जात होती. वाटेत त्यांनी मुलांना वीरपुरुषांच्या अनेक कथा सांगितल्या. त्या कथा ऐकता ऐकता तो लांबचा प्रवास कसा पूर्ण झाला हे त्यांचे त्यांनाच समजले नाही.

मजल दरमजल करीत ते सारे गंगू ब्राह्मणाच्या गावी पोहोचले, तेव्हा यांना कमालीचा थकवा आला होता. जेवणावर देखील त्यांची वासना उरली नव्हती. आपल्या आजीच्या कुशीत ती मुलं पाहता पाहता झोपेच्या अधीन झाली. पण गुजरीदेवींना मात्र झोप येत नव्हती. त्या मुलांची त्यांना सारखी काळजी वाटत होती. आणि म्हणूनच त्या रात्रभर जाग्याच होत्या.

### गंगूचा लोभीपणा

गुजरीदेवींचे सोन्याचे दागिने आणि त्यांच्याजवळ असलेल्या सुवर्ण मोहरा पाहून गंगू पंडिताला त्याचा लोभ सुटला. त्याच्या मनात पाप आले. त्या रात्री गुजरीदेवींची सारी संपत्ती हडपण्याचा त्याने विचार केला. बरीच रात्र होताच गंगू चोर पावलांनी त्यांच्या खोलीत शिरला. खाटेखाली ठेवलेले त्यांचे सामान

त्याने समोर ओढले व त्यातील किंमती वस्तू आणि मोहरा त्याने काढून घेतल्या. गुजरीदेवी हा सारा प्रकार बघत होत्या पण त्या काहीच बोलल्या नाहीत. गंगू ब्राह्मणानं सामानासह तेथून काढता पाय घेतला. जातांना त्याने पूर्ववत् दार लोटून घेतले.

दुसऱ्या दिवशी गंगू त्यांच्या खोलीत आला तेव्हा गुजरीदेवीनं, त्यांचं काही सामान चोरीस गेल्याची माहिती गंगूला दिली. तेव्हा तो म्हणाला, "रात्री एखादा चोर आला असेल."

त्यावर माताजी म्हणाल्या, "बाहेरचा दरवाजा तर बंद होता, मग चोर आत येईल तरी कसा ?"

त्यावर काहीही न बोलता गंगू घराबाहेर पडला अन् त्यानं "चोर चोर" असा ओरडा करण्यास सुरुवात केली. तेव्हा माताजीने गंगूला घरात बोलावून म्हटले, "तुझ्या अशा आरडाओरडीने आम्ही तुझ्याकडे राहतो आहोत हे साऱ्या गावाला कळेल. तुला जे काही हवे आहे ते तू मला मागून घे. एवढेच काय पण तू घेतलेले सामानही मी तुला परत मागणार नाही, पण तू अशी आरडाओरड करू नकोस."

गुजरीदेवीचं बोलणं ऐकून गंगूला भयंकर राग आला. तो संतापून म्हणाला, "ए थेरडे, मी तुला माझ्या घरी आश्रय दिला त्याच्या बदल्यात तू मला चोर ठरवते आहेस ? याचे परिणाम तुला भोगावे लागतील."

**नवाबास कळविले.**

एवढे बोलून गंगू घराबाहेर पडला. त्याच्या मनात एक दुष्ट विचार आला 'जर आपण गुरु गोविंदसिंहाची मुलं आपल्याकडे आहेत, ह्याची माहिती नवाबास दिली तर तो आपल्याला भरपूर इनाम देईल ? हा विचार मनात येताच त्याची पावलं झपझप पडू लागली. तो सरळ मुरींडा येथील ठाण्यात जाऊन पोहोचला. तेथे असलेल्या कोतवालास तो म्हणाला, "महाराज, मी तुम्हाला एक अत्यंत आनंदाची बातमी सांगायला आलो आहे."

"बोला पंडितजी, कोणती आनंदाची बातमी आहे ती ?" कोतवाल म्हणाला.

कोतवालाकडून प्रोत्साहन मिळताच गंगू म्हणाला, "महाराज, गुरु गोविंदसिंह हे मोगल बादशहाचे शत्रु

आहेत, हे तर आपणास ठाऊकच आहे. त्यांनी सतत औरंगजेबाविरुद्ध लोकांना चिथावणी दिली आहे. त्याच गुरु गोविंदसिंहाची आई व दोन मुलं जबरदस्तीने माझ्या घरात घुसली आहेत. महाराज, मी मोगल सल्तनतीचा एक नम्र सेवक आहे आणि म्हणूनच ही गोष्ट आपल्या कानावर घालणं हे मी माझं कर्तव्य समजतो."

## गुजरीदेवी व मुले बंदी

गंगू पंडिताचे बोलणे ऐकून कोतवाल त्याच्यावर अत्यंत प्रसन्न झाला. त्यानं गंगूबरोबर आपले काही शिपाई पाठवून, माताजी व त्या दोन मुलांना पकडून आणण्याचे फर्मान काढले. गंगू पंडित मोठ्या आनंदाने शिपायांसह घराकडे यायला निघाला. घरी गुजरीदेवी व ती दोन बालक अत्यंत निर्धास्तपणे बसलेली होती. गंगूबरोबर काही शिपाई बघून गुजरीदेवी काय समजायचे ते समजल्या. शिपायांनी गुजरीदेवींना कोतवालाची आज्ञा ऐकवली आणि त्या सर्वांना आपल्या सोबत चलण्यास सांगितले. ती दोन मुलं पटकन उठून जाण्यास तयार झाली व आपल्या आजीसह ते अत्यंत निर्भयपणे त्या शिपायांसोबत जाऊ

लागले. रस्त्याने जातांना अनेक नागरिक गुजरीदेवीं-कडे पाहून आपसात कुजबुजत होते. त्या कोवळ्या मुलांचे धाडस पाहून ते त्यांची प्रशंसा करीत होते. त्या सर्वांसमोर गंगू मोठ्या दिमाखानं चालला होता. गंगूचं ते कृत्य पाहून अनेक बायका त्याच्या नावानं कडाकडा बोटे मोडीत होत्या. कोणी त्याला "नमक-हराम" म्हणत होतं, तर कोणी त्याला "राक्षस" म्हणत होतं. माताजी व ती दोन मुलं यांच्या चेहऱ्यावरील विलक्षण तेज पाहून जाणारे येणारे लोक त्यांच्याकडे आकृष्ट होत होते. गंगू मात्र मान खाली घालून लोकांची अपमानास्पद बोलणी मुकाट्यानं ऐकत होता.

गुजरीदेवींना व त्या दोन मुलांना ठाण्यात आण-ण्यात आलं. तिथं त्यांना अटक करण्यात येऊन त्यांची कोठडीत रवानगी करण्यात आली. त्या मुलांची हिंमत खचू नये म्हणून माताजी त्यांना रात्रभर शीख गुरूंच्या त्यागाच्या व बलिदानाच्या गोष्टी ऐकवीत राहिल्या. ती मुलेदेखील अत्यंत तन्मयतेनं आपल्या पूर्वजांच्या वीरश्रीपूर्ण कहाण्या माताजींच्या तोंडून ऐकत होती.




नवाबाच्या दरबारात ती मुलं



...अत्यंत निर्भयपणे उभी राहिली.

## सरहिंदकडे प्रस्थान

दुसऱ्या दिवशी गुजरीदेवी व ती दोन मुलं यांना बैलगाडीत बसवून, शिपायांच्या कडेकोट बंदोबस्तात त्यांची सरहिंदकडे रवानगी करण्यात आली. माताजी आणि ती दोन बालकं कमालीचा मनोनिग्रह दाखवीत, त्या बैलगाडीत बसले होते. त्यांना पाहाण्यासाठी रस्तोरस्ती अपार जनसमुदाय उफाळला होता. त्यामुळे घाबरून मोगल शिपाई भराभर चालू लागले. मजल दरमजल करीत ते सरहिंद गावी पोहोचले. त्यावेळी त्या मुलांचे व माताजींचे कंठ सुकून गेले होते. ते तहानेने व्याकूळ झालेले होते, तरीही त्या दुष्ट शिपायांनी त्यांना प्यायला पाणीही दिले नाही. ते डिसेंबर महिन्याचे थंडीचे दिवस असूनही त्यांना तेथील किल्ल्यात उघड्यावरच ठेवण्यात आले. अशा वेळी त्यांचा परमेश्वराशिवाय दुसरा कोण वाली होता? ते त्याचीच करुणा भाकू लागले.

## माताजींना आश्वासन

त्या रात्री माताजींनी त्या मुलांना अनेक वीररसपूर्ण गोष्टी ऐकविल्या. त्या मुलांचा तो कसोटीचा

काळ होता. त्या कसोटीच्या वेळी ती मुलं आपला धर्म सोडून अन्य धर्माचा स्वीकार करतील अशी माताजींना भीती वाटत होती. म्हणून त्यांनी त्या मुलांना आपल्या वडिलांचे नाव राखण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत परधर्माचा स्वीकार न करण्याविषयी वारंवार बजावले. त्या मुलांनीही आपण कोणतीही किंमत देऊ पण स्वधर्म सोडणार नाही असे माताजींना आश्वासन दिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी त्या मुलांना नेण्यासाठी शिपाई आले, तेव्हा ती मुले त्यांच्याबरोबर जाण्यासाठी तात्काळ सिद्ध झाली. मुलांनी माताजींच्या चरणांना स्पर्श करून त्यांचे आशीर्वाद मागितले. माताजींनी देखील त्यांना "यशस्वी व्हा" असा आशीर्वाद दिला.

त्यानंतर छाती पुढे काढून अत्यंत दिमाखानं ती मुलं त्या शिपायांबरोबर जाऊ लागली. शिपायांनी त्यांना नवाब वजीरच्या दरबारापर्यंत पायीच रखडत नेलं. नवाबाच्या दरबारात ती मुलं अत्यंत निर्भयपणे उभी राहिली. त्यांच्या चेहऱ्यावर भीतीचा लवलेशही

दिसत नव्हता. नवाबाच्या दिवाणासमोर त्यांना पेश करताच त्या बालकांनी उच्च स्वरात जयघोष केला,

"वाहि गुरुजीकी खालसा
वाहि गुरुजीकी फतह"

## धर्मान्तराचा सल्ला

दरबारात जमलेले सारे दरबारी त्या दोघा साहसी बालकांकडे आश्चर्यमिश्रित कौतुकाने पाहू लागले. त्या बालकांनी केशरी वस्त्रं परिधान केली होती, मस्तकावर पगडी धारण केली होती आणि त्यांच्या कंबरेला कृपाण लटकत होते. त्या स्वरूपात ती मुलं खूपच देखणी दिसत होती.

त्यांच्या चेहऱ्यावरील सुकुमारता, त्यांनी धारण केलेला वीर पुरुषाचा पोशाख व त्यांचे सुंदर तेज:पुंज चेहरे पाहून नवाब वजीरखानाच्या मनात त्या बालकांविषयी अनुकम्पा दाटून आली. तो त्या मुलांना समजावणीच्या स्वरात म्हणाला, "बाळांनो, तुम्ही किती कोवळे व सुंदर आहात! तुम्ही नवाबांच्या मुलांसारखं रहावं अशी माझी इच्छा आहे. अट एवढीच की तुम्ही इस्लाम-धर्माचा स्वीकार करावा.




बाळांनो, आज तुम्ही आपल्या पित्याची लाज राखली.

त्याबद्दल तुम्ही मागाल ते बक्षीस तुम्हाला देण्यात येईल. बोला मुलांनो, तुम्हाला या अटी मान्य आहेत ?"

नवाबाच्या बोलण्यावर ती मुलं ताडकन् उत्तरली, "आम्हाला आमचा धर्म आमच्या प्राणाहून देखील प्यारा आहे. शरीरात शेवटचा श्वास असेपर्यंत आम्ही आमचा धर्म सोडणार नाही."

### ते निरपराधी आहेत

त्या बालकांना शिक्षा देण्यापूर्वी नवाबानं काजीचा सल्ला घेतला. काजी म्हणाला, "ही मुलं निष्पाप आणि निरपराधी आहेत. इस्लामी धर्माप्रमाणे यांना सजा देता येणार नाही."

त्यावर नवाब म्हणाला, "ही बंडखोर बापाची बंडखोर औलाद आहे."

"असेल," काजी शांतपणे म्हणाले, "पण इस्लामी कायद्याप्रमाणं बापाची शिक्षा मुलांना देता येत नाही."

"पण त्यांनी या दरबाराचाही अपमान केला आहे," नवाब म्हणाला.

" केला असेल," काजी पुन्हा निर्धाराने म्हणाले, " पण ही मुलं कोवळ्या वयाची आहेत, अजाण आहेत आणि म्हणूनच ती निरपराध आहेत,"

काजीने असा खुलासा करताच नवाबानं पुन्हा त्या बालकांची धर्मान्तर करण्यासाठी मनधरणी करण्यास सुरुवात केली. तो त्यांना म्हणाला. "मुलांनो अजूनही वेळ गेलेली नाही. तुम्ही आपले आयुष्य व्यर्थ बरबाद करू नका. इस्लाम धर्माचा तुम्ही स्वीकार करा आणि बादशाही थाटात रहा."

## धर्म प्राणाहून प्रिय

नवाबाच्या बोलण्याचा त्या मुलांवर तीळमात्रही परिणाम झाला नाही. ते खणखणीत स्वरात निर्भयपणे म्हणाले, गुरु गोविंदसिंहाचे आम्ही पुत्र आहोत. आमचे आजोबा गुरु तेगबहादूर यांनी धर्माचे रक्षण करण्यासाठी आत्मबलिदान केले होते. आम्ही त्यांचेच वंशज आहोत. आम्ही आमचा धर्म कधीही सोडणार नाही, कारण आमचा धर्म आम्हाला आमच्या प्राणाहूनही अधिक प्रिय आहे."

त्या बालकांचं बोलणं ऐकून दिवाण सुच्चानंद

उठून उभे होत त्यांना म्हणाले,

" पोरांनो, तुम्हाला मी सोडून दिलं तर तुम्ही काय कराल ?"

त्यावर बालक जोरावरसिंह ताडकन् म्हणाला, " आम्ही सैन्य जमवू आणि तुमचे अत्याचार समाप्त करण्यासाठी तुमच्याशी युद्ध करू,"

" आणि त्या युद्धात तुमचाच पराभव झाला तर"– दिवाणानं विचारलं.

" पराभव हा शब्द आम्हाला ठाऊक नाही. तुमची दुष्ट सत्ता जोपर्यंत समाप्त होत नाही, तोपर्यंत आम्ही तुमच्या सैन्याशी झुंजत राहू नाहीतर झुंज घेत घेत आम्ही प्राणार्पण करू," जोरावरसिंहानं अत्यंत दृढतापूर्वक उत्तर दिलं.

मुलांचं मनोधैर्य खच्ची करण्यासाठी दिवाण सुच्चानंद म्हणाले, " पोरांनो, तुमचे वडील व दोन्ही भाऊ युद्धात मारले गेले आहेत हे तुम्हास ठाऊक आहे काय ? या जगात तुमचं आता कुणीच उरलेलं नाही. तेव्हा तुम्ही मुकाटयाने नवाबाचं म्हणणं ऐकून इस्लाम–धर्माचा स्वीकार करा."

त्यावर बिजलीप्रमाणं कडाडत ती मुलं म्हणाली, " आमचे वडील मोठे लढवय्ये आहेत. त्यांना कुणीही मारू शकत नाही."

त्यावर दिवाण सुच्चानंद नवाबाकडे वळून त्याला खिजविण्यासाठी म्हणाला " ऐकलंत नवाबसाहेब, ही पोरं तुमच्या शासनाविरुद्ध आत्ताच युद्ध करण्याच्या गोष्टी करीत आहेत, मग मोठी झाल्यावर तर स्वत:च्या बापाप्रमाणं बादशाही सल्तनत खत्म करण्याचा निश्चितच प्रयत्न करतील. या सापाच्या बच्च्यांवर दया दाखवणं आत्मघातकीपणाचंच ठरेल."

दिवाण सुच्चानंद नवाबाशी याप्रमाणं गोष्टी करीत असतांना ती मुलं अत्यंत निर्भयपणे त्यांचा संवाद ऐकत होती. त्यांच्या चेहऱ्यावर अधूनमधून स्मितरेखा उमटत होती.

त्यानंतर दिवाणाने काजीकडे वळून ही मुलं भविष्यात बंडखोरी करण्याची कशी शक्यता आहे, हे त्याला सांगण्यास सुरुवात केली. त्या मुलांच्या उर्मट उत्तरांनी काजी मनातल्या मनात आधीच संतापला होता. आता तर काय आगीत तेलच पडलं ! ताडकन उठून उभा होत काजी म्हणाला, " ही पोरं राजाविरुद्ध

बंड करण्यास तयार झाली आहेत; उघड उघड मोगल साम्राज्याशी शत्रुत्व करीत आहेत. तेव्हा त्यांना जिवंत ठेवणे धोक्याचे आहे. त्यांना भिंतीत जिवंत चिणून टाका."

## मलेरकोटलाच्या नवाबाचा नकार

काजीच्या बोलण्याचा त्या मुलांवर काहीही परिणाम झाला नाही. ते निर्भयपणे व प्रसन्न मुद्रेने त्या दरबारात उभे होते.

त्यांच्याकडे पाहतांना नवाबाच्या मनात एक विचार आला. मलेरकोटलाच्या नवाबाचा भाऊ शेर महम्मद खान हा गुरु गोविंदसिंह यांच्याशी युद्ध करतांना मारला गेला होता. तेव्हा गुरु गोविंदसिंहाच्या या मुलांना शिक्षा देण्यासाठी मलेरकोटलाच्या नवाबाच्या स्वाधीन करावे असा विचार सरहिंदच्या नवाबाने केला. या मुलांना भिंतीत चिणून ठार मारल्याने आपल्या भावाच्या मृत्यूचा बदला घेतल्याचे त्याला समाधान मिळेल. अशी त्याची त्यामागील भावना होती.

त्याप्रमाणे त्याने जासूद पाठवून मलेरकोटलाच्या नवाबाला आपल्या दरबारात पाचारण केले. नवाब

दरबारात हजर होताच सरहिंदचा नवाब त्याला म्हणाला, " शीखांनी तुमच्या भावाला ठार केले आहे. गुरु गोविंदसिंहाची दोन मुलं आता माझ्या ताब्यात आहेत. काजीनं त्यांना भिंतीत जिवंत चिणून टाकण्याचा हुकूम केला आहे. या मुलांना आम्ही तुमच्या हवाली करीत आहोत. तुम्ही त्यांना भिंतीत चिणून आपल्या भावाच्या मृत्यूचा सूड घेऊ शकाल."

मलेरकोटलाचा नवाब या गोष्टीला तात्काळ राजी होईल असं सरहिंदच्या नवाबाला वाटत होते. पण घडलं मात्र नेमकं उलटं. मलेरकोटलाचा नवाब हा अत्यंत धार्मिक प्रवृत्तीचा माणूस होता. तो म्हणाला, " हा अत्याचार करणं माझ्याच्यानं जमणार नाही. माझा भाऊ युद्धात मारला गेला होता. त्याबद्दल ही निर्दोष मुलं कशी काय दोषी ठरतात ?" त्याचा तो निर्णय ऐकून सरहिंदचा नवाब थक्कच झाला.

### आजी मुलांवर खुश झाली !

संध्याकाळी ती पोरं आपल्या आजीजवळ पोचली. त्यांनी तिला दरबारात जे काही घडलं ते सविस्तर कथन केलं. ते ऐकून आजी त्यांच्यावर खूपच खुश

झाली. त्यांच्या निर्भयतेचे कौतुक करीत ती प्रसन्नतेने म्हणाली, "बाळांनो, आज तुम्ही आपल्या पित्याची लाज राखलीत."

दुसऱ्या दिवशी त्या बालकांना पुन्हा दरबारात आणण्यात आलं. ती मुलं धर्मान्तर करण्यास अजूनही तयार होतील असं नवाबाला उगीचच वाटत होतं. अखेरचा प्रयत्न करावा म्हणून तो त्या मुलांना म्हणाला, " बाळांनो, अजूनही उशीर झालेला नाही. तुम्ही माझं ऐका आणि इस्लामचा स्वीकार करून आरामात रहा. पण जर का तुम्ही इस्लाम–धर्म स्वीकारला नाही, तर मात्र तुम्हाला जिवंतपणी भिंतीत चिणून टाकण्यात येईल."

**मरणा न भीत तुज मी**

नवाबाच्या त्या बोलण्यावर ती दोन मुलं अत्यंत निर्भयपणे म्हणाली, " मरणाची कुणाला भीती दाखवता ? मृत्यू आम्हाला स्पर्शदेखील करू शकणार नाही. आम्ही कोणत्याही परिस्थितीत इस्लाम धर्माचा स्वीकार करणार नाही, एवढं मात्र पक्केपणी ध्यानात असू द्या. आम्हाला आमचा धर्म प्राणाहून देखील अधिक प्यारा आहे."

त्या मुलांचे ते निर्भय आणि बेडर उत्तर ऐकून नवाब वजीरखान ह्याला अत्यंत क्रोध आला, पण दरबारात जमलेले लोक मात्र मनातल्या मनात त्या मुलांच्या साहसपूर्ण उत्तराचे कौतुक करू लागले.

" या सैतानांना तावडतोब भिंतीत चिणून टाका," नवाबानं क्रुद्ध होऊन आदेश दिला.

दिल्ली दरबारचे खास जल्लाद म्हणून ओळखले जाणारे शिशाल बेग आणि विशाल बेग हे दोघंही त्यावेळी नवाब वजीरखानच्या दरबारात उपस्थित होते. त्या मुलांना त्यांच्या स्वाधीन करण्यात आले. त्या मुलांना आपल्या ताब्यात घेऊन त्यांच्यासह ते जल्लाद बाहेर पडले. ते दोघे वीर बालक अत्यंत निर्भयपणे समोर चालत होते.

त्यांना भिंतीत चिणण्यात येणार असल्याची बातमी हां, हां म्हणता सगळ्या नगरभर पसरली आणि त्या मुलांना नेत असल्याच्या मार्गाच्या दुतर्फा हजारो लोकांची गर्दी जमली. त्या जमावातील माणसं, नवाब आणि गंगू यांची निर्भत्सना करीत होती, तसेच त्या मुलांच्या साहसानं ते सारे स्तंभित झाले होते.

त्या मुलांना नियोजित स्थळी आणण्यात आले. त्या मुलांना मधोमध उभं करून गवंड्यांनी त्यांच्या चारही बाजूंनी भिती उभारण्याचं काम सुरू केलं. तो प्रकार पाहण्यासाठी सारा गाव उलटला होता.

भितीची उंची त्या मुलांच्या कमरेपर्यंत झाली तेव्हा काजीनं त्या मुलांना इस्लाम धर्माचा स्वीकार करण्याविषयी पुन्हा एकदा म्हटले. पण त्या मुलांचा निर्धार पक्का होता. ती म्हणाली "आम्ही इस्लामचा स्वीकार करणार नाही. या जगातील कोणतीही शक्ती आम्हाला आमच्या धर्मापासून परावृत्त करू शकणार नाही."

## भित लवकर उभारा

त्या मुलांना त्या ठिकाणी आणणाऱ्या जल्लादांनी देखील त्या मुलांना इस्लाम धर्म स्वीकारून आपले प्राण वाचविण्याचा सल्ला दिला. त्यावर ती मुलं ताडकन म्हणाली, " तुम्ही आज आमच्याभोवती जी भित उभारता आहात, ती पापांची आणि अन्यायाची भित आहे. तुम्ही ही पापाची भित शक्य तितक्या लवकर उंच करा कारण ही पापाची भित जितक्या लवकर

उभी होईल तितक्या लवकर हे मोगल साम्राज्य खाली कोसळेल" आणि एवढं बोलून त्या दोन्ही मुलांनी जपुजीसाहबचा पाठ म्हणण्यास सुरुवात केली.

## हे अश्रू कशासाठी ?

विटेवर वीट चढू लागली आणि पाहता पाहता भिंतीची उंची वाढू लागली. त्या मुलाचं ते शौर्य बघून ग्रामवासी स्तंभित झाले. भिंतीची उंची बघता बघता त्या बालकांच्या कानाइतकी झाली. मोठा भाऊ असलेल्या जोरावरसिंहानें आपल्या लहान भावाकडे, फतेहसिंहाकडे साश्रू नयनांनी अखेरचं बघितलं, आपल्या भावाच्या डोळ्यातील अश्रू बघून फतेहसिंहाचं मन क्षणभर विचलित झालं

तो आपल्या भावाला म्हणाला, "वीरपुरुषा, तुझ्या डोळ्यात हे अश्रू कशासाठी ? बलिदान करण्याची भीती तर वाटत नाही ना ?"

फतेहसिंहाचे ते शब्द जोरावरसिंहाच्या काळजात

तीरासारखे घुसले. त्याने बेडरपणे उभा असलेल्या आपल्या धाकट्या भावाकडे एकवार दृष्टीक्षेप टाकला आणि खळाळणाऱ्या झऱ्याप्रमाणं हसत तो म्हणाला, "फतेहसिंहा, तू तर फार भोळा आहेस! अरे बावा, मी मृत्यूला मुळीच घाबरत नाही उलट मृत्यूलाच माझं भय वाटते. म्हणून तर तो मला सोडून प्रथम तुझा घास घेण्यास पुढे सरसावला आहे. मला दु:ख एवढ्याच गोष्टीचं झालं की या जगात तू माझ्यामागून आलास आणि निघाला आहेस मात्र माझ्या अगोदर! बलिदान करण्याची संधि पहिल्यांदा तुला मिळाली आहे. माझा पराभव झाला आहे याचंच मला दु:ख होतंय."

मोठ्या भावाचं हे वीरश्रीपूर्ण व साहसी उत्तर ऐकून फतेहसिंह निश्चित झाला.

## भिंतीत वीर ते चिणले

मग मात्र गवंड्यांनी भराभर विटावर विटा चढवून भिंत वेगाने उभारायला सुरुवात केली. इकडे सूर्य अस्ताला जात होता आणि तिकडे कारागीर

भराभर काम उरकीत होते. ती दोन साहसी बालकं डोळे बंद करून आपल्या आराध्य देवतांचं स्मरण करीत होती. हळुहळू ती भिंत त्या बालकांच्या डोक्यापेक्षाही उंच झाली. त्या बालकांची अपूर्व धर्मनिष्ठा बघून तेथे जमलेला जनसमुदाय स्वत:च्या भ्याडपणाची निर्भर्त्सना करू लागला. अखेर त्या उंच भिंतीनं त्या दोघा बालकांना स्वत:त सामावून घेतलं.

## निर्दय हत्या

काही वेळानं ती भिंत पाडण्यात आली. त्यावेळी ते दोन अश्राप जीव त्या भिंतीत बेशुद्धावस्थेत पडलेले आढळले. त्या अत्याचारी नवाबाच्या हुकूमावरून त्या दोन्ही बालकांची क्रूर हत्त्या करण्यात आली.

एवढ्या लहान मुलांना क्रूरपणे ठार करण्यात आल्याचं दुसरं उदाहरण इतिहासात शोधूनही सापडणार नाही हे जितकं खरं तितकच एवढं अपूर्व साहस अल्पवयीन बालकांनी दाखवल्याचंही दुसरं उदाहरण सापडत नाही, हेही तितकंच खरं. त्या मुलांवर अत्याचार होत असतांना त्यावेळचे भारतीय तो अत्याचार

निमूटपणे बघत राहिले. त्यांचं पौरुषत्व इतकं मुर्दाड बनलं होतं की त्या मुलांना चिणून टाकण्याची घटना बघत असतांना त्यांचं रक्त उसळलं नाही. भ्याड-पणाचं याहून आणखी उदाहरण दुसरं कोणतं असू शकतं ?

### माता गुजरी यांची हत्त्या

त्या मुलांची हत्त्या केल्यानंतर बुरुजावर बंदिवा-सात ठेवलेल्या माता गुजरीदेवींचाही त्याच बुरुजावरून कडेलोट करण्यात आला. बुरुजावरून खाली पडताक्षणी त्यांचं प्राणपाखरू उडून गेलं.

### तोडरमलद्वारा अन्त्य संस्कार

ज्या नगरात नवाबासारखा क्रूरकर्मा शासक रहात होता त्याच नगरात दिवाण तोडरमलासारखा सत्पुरु-षही वास करीत होता. त्या अबोध बालकांची निर्दयपणे हत्त्या करण्यात आल्याचे कळताच त्यांचं मन आक्रंदू लागलं. त्या मुलांच्या प्राणांचं रक्षण आपण करू शकलो नाही याचं दु:ख त्याला डाचत होतं.

अत्यंत दुःखी अन्तःकरणानं तो नवाव वजीरखाना-जवळ पोचला आणि त्यानं त्या बालकांच्या मृतदेहा-वर अन्त्यसंस्कार करण्याची परवानगी मागितली. पण नवाबाजवळ माणूसकीच उरली नव्हती. त्याचं एवढं अधःपतन झालं होतं की त्यानं अन्त्यसंस्कारा-साठी आवश्यक असलेल्या जागेची किमत चुकवायला दिवाणास सांगितलं. तो त्याला म्हणाला, "तोडरमल तुला जेवढी जागा हवी आहे तेवढ्या जागेत सोन्याच्या मोहरा पसरून त्या तू मला दे."

दिवाण तोरडमल हा श्रीमंत जोहरी होता. तो ताबडतोब आपल्या घरी गेला आणि त्यानं घरून एक पोतंभर मोहरा आणल्या. अग्निसंस्कारासाठी आवश्यक असलेल्या जागेवर मोहरा पसरून त्याने त्या नवाबाच्या स्वाधीन केल्या. त्यानंतर दिवाण तोडरमलनं त्या दोन बालकांचा अत्यंत सन्मानपूर्वक अग्निसंस्कार केला.

त्यांच्याच शेजारी त्यांच्या आजीच्या मृतदेहावरही त्यानं अग्निसंस्कार केला. त्या जळणाऱ्या चितांकडे पाहतांना त्या वृद्ध दिवाणाच्या डोळ्यातून झरझर आसवं झरत होती. जणू त्याची स्वतःचीच मुलं

त्याला चिरंतन काळासाठी दूरावली होती !

ही घटना घडली तेव्हा जोरावरसिंहाचं वय अवघं सात वर्ष अकरा महिने इतकच होतं. फतेहसिंह तर अवघा पाच वर्ष दहा महिन्यांचा होता.

आता गुरु गोविंदसिंह एकटेच उरले होते. त्यांचा संपूर्ण परिवार देशासाठी शहीद झाला होता. त्यांचे दोन पुत्र त्यांच्या नजरेसमोर चमकौर येथे झालेल्या लढाईत कामास आले होते. त्यांच्या दोघा लहान मुलांची हत्त्या करण्यात आल्याची बातमी त्यांना समजली तेव्हा ते माछीवाडा येथे एका झाडाखाली वसले होते. आपल्या मुलांच्या मृत्यूची वार्ता ऐकून गुरुजी क्षणभरही विचलित झाले नाही. हातातील बाणाच्या टोकानं त्या झाडाखालील एक लहानसे रोप उखडून फेकीत ते म्हणाले, "आता मोगल साम्राज्याच्या मुळालाच धक्का बसला आहे."

**बंदा बैरागी**

दाट जंगल, उंच पहाड आणि विस्तीर्ण नद्या पार

करीत गुरु गोविंदसिह गोदावरी नदीच्या तीरावर येऊन पोहचले. नदीच्या किनाऱ्यावर माधवदास गोसाव्याचा आश्रम होता. ते तेथे पोहचले तेव्हा माधवदास ध्यान धारणेत मग्न होते. गुरुजींच्या आगमनानं माधवदासांची समाधी भंग पावली. त्यामुळे क्रुद्ध होऊन ते म्हणाले, "आपण कोण आहात ? या आश्रमात पाऊल ठेवण्याची तुम्ही हिंमत तरी कशी केली ?"

त्यावर गुरु गोविंदसिंह शांत स्वरात म्हणाले, "मी कोण आहे ? मी कोण आहे ते तुम्हाला पक्के ठाऊक आहे. तुम्ही स्वतःलाच विचारा मी कोण आहे ?"

त्यांचं ते उत्तर ऐकून माधवदास विस्मित झाले. क्षणभर त्यांनी गुरुजींकडे बघितलं आणि मग त्यांच्या पायावर लोळण घेत ते म्हणाले, "गुरुजी, मी आपला बंदा आहे."

गुरु गोविंदसिहांनी माधवदासांचं नाव बंदासिंह बहादूर ठेवले. त्यांनी त्याला पाच बाण, आपली तलवार व आपला ध्वज दिला. अशा तऱ्हेने गुरु

गोविंदसिंहांनी एका सन्याशाला वीरपुरुष बनविले. बंदासिंहानं सर्वत्र विखुरलेलं सैन्य एकत्र केले आणि गोविंदसिंहांच्या बालकांची हत्त्या करणाऱ्यांना धडा शिकविण्यासाठी त्यानं पंजाबच्या दिशेनं आगेकूच केलं. पंजाबात पोहचल्यावर अनेक शीख सैनिक त्यांना सामील झाले. मग त्यांनी आपल्या प्रचंड सैन्यासह सरहिंदवर हल्ला केला. त्या हल्ल्यात नबाब वजीर-खान मारला गेला. आणि सारे सरहिंद नगर नष्ट करण्यात आले.

अशा तऱ्हेने बंदा बैरागी यांनी गुरु गोविंदसिंहांच्या मुलांची हत्त्या करणाऱ्यांना शिक्षा दिली.

□ □

म. ग्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
बा. क्र. 9434 दिनांक 9/1/810
विषय
BVBK-0401535
BVBK-0401535

॥ श्री ॥

# भारत - भारती

## बाल-पुस्तकमाला

( मराठी )

१. स्वामी विवेकानंद
२. स्वातंत्र्यवीर सावरकर
३. पं. दीनदयाल उपाध्याय
४. नचिकेता
५. भगिनी निवेदिता
६. वीर अभिमन्यू
७. विश्वामित्र
८. लाला लजपतराय
९. महासती द्रौपदी
१०. संत गुलाबराव महाराज
११. गुरुपुत्र फतेहसिंह, जोरावरसिंह
१२. छत्रपती शिवाजी

□

---

किंमत प्रत्येकी रुपये २-००

विविधतेत एकतेचे दर्शन
भाषिक एकात्मतेचा अनुभव

# "गीत - भारती"

आपल्या देशातील १४ भाषांमधील ६६ राष्ट्रीय गीते
देवनागरी लिपीत
सोबत त्यांचा हिन्दी भावार्थ

आकार १/८ क्राऊन : पृष्ठ-संख्या १५०

मूल्य केवळ रु. ४-५०

प्राप्ति-स्थान
**भारत-भारती**
बाल-पुस्तकमाला
रुईकर पथ, नागपुर-४४० ००२